**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक रावसाहेब फराटे
मु.पो.मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, श्री वाघेश्वर विद्याधाम,
मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री वाघेश्वर विद्याधाम,
मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नवनाथ काशिनाथ शितोळे
मु.पो.मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री वाघेश्वर विद्याधाम,
मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे श्री.ए.आर.वेताळ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३०.१०.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.११.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

श्री वाघेश्वर विद्याधाम, मांडवगण फराटा ही शाळा / संस्था विद्यार्थ्यांकडून घेत असलेल्या विकास निधीबाबत चुकीची माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री वाघेश्वर विद्याधाम, मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे श्री.ए.आर.वेताळ यांनी दिली. विकास निधी म्हणून २५० रूपये शुल्क आकारले जाते, त्याची लेखी तपासणी केली जात नाही. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारावयाचे नसतानाही शुल्क घेतले जाते, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अशोक रावसाहेब फराटे यांनी केली.

शाळा सुधारणा शुल्क १०० रूपये व परीक्षा शुल्क १५० रूपये घेतले जाते. त्याबाबतची माहिती अपीलकर्त्यास विहित मुदतीत दिली आहे. तीन वर्षांत घेतलेल्या विकासनिधीची माहिती त्यांनी मागितली आहे. परंतु सन २००४-२००५ पासून असा निधी घेतला जात नाही. सर्व हिशेबाची लेखा तपासणी झाली असून अपीलकर्त्यास विहित मुदतीत टपालाने माहिती पाठविली आहे. आणखी माहिती हवी असल्यास देण्याची तयारी आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री वाघेश्वर विद्याधाम, मांडवगण फराटा, ता.शिरूर, जि.पुणे श्री.ए.आर.वेताळ यांनी पूरक कागदपत्रांसह केले. त्यावरून अपीलकर्त्यास माहिती देण्यात आल्याचे दिसते. शुल्क आकारणीबाबतचे अपीलकर्त्याचे आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विषय नाही. माहिती पाठविल्याच्या जावक बारनिशीतील नोंदीची प्रत आयोगाला सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्याची पोहोच असलेल्या

प्रतीसह जावक बारनिशीतील नोंदीची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला दि.२५.२.२०१० रोजी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.लिंबाजी वसंत कुंभार
मु.पो.लोणी देवकर, ता.इंदापूर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कृषी विस्तार अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९५/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.०२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता-** श्री.लिंबाजी वसंत कुंभार<br>मु.पो.लोणी देवकर, ता.इंदापूर,<br>जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर,<br>जि.पुणे श्री.के.सी.जाधव<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** कृषी विस्तार अधिकारी,<br>पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.आर.अे.काळे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.०४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१३.०८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.०८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.०९.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला कोणतीही माहिती ३० दिवसांत दिली नाही. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करावी व माहिती निःशुल्क द्यावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.लिंबाजी वसंत कुंभार यांनी लेखी निवेदनात केली आहे.

अपीलकर्त्याने ढोबळ व विस्तृत स्वरुपात मागितलेली आहे. देऊ केलेली माहिती त्यांनी स्वीकारली नाही. तसेच विशिष्ट स्वरुपाच्या नमुन्यातच माहिती मिळावी, अशी त्यांची मागणी असून तशा स्वरुपात संकलित माहिती अभिलेखात उपलब्ध नाही. अभिलेखांचे अवलोकन करुन माहिती घ्यावी, असे त्यांना कळविले होते. परंतु ते आले नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा कृषी विस्तार अधिकारी,पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.आर.अे.काळे यांनी नमूद केले. उपलब्ध माहिती घेण्यासाठी न येता श्री.कुंभार यांनी अपील केले. त्यांनी मागितलेली माहिती सुमारे दहा ते बारा हजार पानांची होईल. म्हणून अभिलेखांचे अवलोकन करण्यास कळविले होते. तसेच त्यांनी दिलेल्या नमुन्यात माहिती देण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती इंदापूर,ता.इंदापूर,जि.पुणे श्री.के.सी.जाधव यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि.** 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत एस.पवार
१२०६, बी/१, शिवाजीनगर, पुणे -४ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
तहसील कार्यालय मुळशी (पौड),
ता.मुळशी, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय मुळशी (पौड),
ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९१/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,<br>तहसील कार्यालय मुळशी (पौड),<br>ता.मुळशी, जि.पुणे श्री.भाऊसाहेब जाधव<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय मुळशी (पौड),<br>ता.मुळशी, जि.पुणे श्री.किशोर घाडगे | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.७.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.५.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२४.९.२००७ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

भूखंडाचा खरेदी दस्त, संमती दस्त यानुसार करावयाच्या नोंदींबाबत मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय, मुळशी (पौड),ता.मुळशी, जि.पुणे श्री.किशोर घाडगे यांनी दिली नाही. या दस्तांची नोंद केली नाही. तसेच लीज पेंडन्सीबाबत कार्यवाही केलेली नाही व त्याबाबतची माहिती दिली नाही. ३० दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय, मुळशी (पौड), ता.मुळशी, जि.पुणे श्री.भाऊसाहेब जाधव यांनी देऊनही जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय, मुळशी (पौड),ता.मुळशी, जि.पुणे यांनी माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शशिकांत एस.पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडील कडील अपील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली आहे.

श्री.पवार यांना सर्व माहिती देण्यात आली. त्यांच्या मागणीप्रमाणे नोंद धरुन तत्कालीन गावकामगार तलाठ्यांनी नोंद रद्द केली असून त्याबाबतचे अपीलकर्त्याने मागितलेले स्पष्टीकरणही देण्यात आलेले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,मुळशी (पौड),ता.मुळशी, जि.पुणे श्री.किशोर घाडगे यांनी केले. ते पाहता माहिती देण्याबरोबरच जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,मुळशी (पौड),ता.मुळशी, जि.पुणे श्री.किशोर घाडगे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय, मुळशी (पौड), ता.मुळशी, जि.पुणे श्री.भाऊसाहेब जाधव यांनी अपीलकर्त्याच्या मागणीबाबत प्रशासकीय कार्यवाहीही केल्याचे स्पष्ट होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**स्थळ : पुणे**
**दि.** 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. अजय तुकाराम मोरे
पी.एम.सी.कॉलनी नं.७, जी/४,
घोरपडे पेठ, पुणे-४११०४२

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सेवकवर्ग),**
पुणे महानगरपालिका, पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सेवक वर्ग विभाग अधिकारी,**
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/११/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११/११/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३/११/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७/११/२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणी अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. अजय तुकाराम मोरे यांनी दाखल केलेल्या अपिलामधील विषय व त्यांची यापूर्वीची आयोगाकडील तक्रार (क्र. ४०६/२००९/पुणे) यामधील विषय एकच आहे. सदर तक्रारीवर राज्य माहिती आयोगाने दि. १७/१२/२००९ रोजी आदेश पारित केलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही झाली असून तेच याप्रकरणीही लागू आहे. सबब श्री. मोरे यांचे सदरचे अपील दखल पात्र नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 29 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप भगवान खामकर
मु.शिनगरवाडी, पो.टाकळीहाजी, ता.शिरूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६११ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे संतोष गंगाराम मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे गुणवंत वैजनाथ पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.१२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हजर नसल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

वादळ व पाऊस यामुळे पडलेले विजेचे खांब पुन्हा उभे करण्यास सुमारे साडेतीन महिन्यांचा कालावधी लागला. त्याबाबत अपीलकर्ता श्री.दिलीप भगवान खामकर यांनी दोन अर्जांद्वारे मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली. पोल उभारण्यास झालेल्या विलंबामुळे आपल्या शेतीचे नुकसान झाले, असे अपीलकर्त्याचे म्हणणे असून त्याबाबतची त्यांची तक्रार हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे श्री. गुणवंत वैजनाथ पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे श्री.संतोष गंगाराम मोरे यांनी केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. रमेश दिनकर पुंडे
३, धनदा अपार्टमेंट्स, भक्ती मार्ग,
लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे-४११ ००४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनोंदणी महानिरीक्षक
व मुद्रांक नियंत्रक, नवीन प्रशासकीय इमारत, — उत्तरवादी
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११ ००१

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक
व मुद्रांक नियंत्रक, नवीन प्रशासकीय इमारत,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१६ + १६१७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनोंदणी महानिरीक्षक
व मुद्रांक नियंत्रक, नवीन प्रशासकीय इमारत,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११ ००१ श्री. अ. रा. देवगुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक
व मुद्रांक नियंत्रक, नवीन प्रशासकीय इमारत,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११ ००१ श्री. चिंतामण भुरकुंडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-यांने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १७.२.२०१० रोजी आयोगापुढे सुनावणी घेण्यात आली.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांच्या कार्यालयातील लेखा विभागातील कामकाजात दप्तर दिरंगाई कायद्यानुसार कार्यवाही होत नाही, त्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती दिशाभूल करणारी व चुकीची दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रमेश दिनकर पुंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली.

श्री. पुंडे यांचा मूळ विषय दप्तर दिरंगाई कायद्यानुसार कार्यवाही करण्याबाबतचा होता. त्यांच्या संदर्भातील पत्राबाबत त्यांनी केलेल्या विचारणेनुसार उप संचालक (लेखा ), नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे यांच्याकडून माहिती उपलब्ध करून घेऊन श्री. पुंडे यांना दिली, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे श्री. चिंतामण भा. भुरकुंडे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. माहिती देण्यात आली आहे, कार्यवाही योग्य-अयोग्य हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक माधव पिंगळे
फ्लॅट क्र.२९, मारूती कॉम्प्लेक्स, औंधगाव, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, पुणे शहर (४),
पुणे सहकारी संस्था, साखर संकुल आवार, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, प्रियदर्शनी महिला
औद्योगिक सहकारी संस्था मर्या., ५४, औंधगाव, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक माधव पिंगळे
फ्लॅट क्र.२९, मारूती कॉम्प्लेक्स, औंधगाव, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, पुणे शहर (४), पुणे सहकारी संस्था,
साखर संकुल आवार, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.आर.एम.जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, प्रियदर्शनी महिला औद्योगिक सहकारी
संस्था मर्या., ५४, औंधगाव, पुणे श्रीमती एस.डी.जगताप

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१८.९.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.१०.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.१२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली.

प्रियदर्शनी महिला औद्योगिक सहकारी संस्थेने अकारण व अन्यायकारक पध्दतीने आपल्या पत्नीचे सदस्यत्व रद्द केले. आपण मागितलेली माहिती एकही कागद प्रमाणित न करता, चुकीची व अपुरी दिली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.अशोक माधव पिंगळे यांनी केले.

आपल्या संस्थेला कोणत्याही स्वरूपाचे शासकीय अर्थसहाय्य व सवलती मिळत नाहीत तरीही श्री.पिंगळे यांना वेळोवेळी माहिती देण्यात आली. माहितीच्या मागणीचे व अन्य स्वरूपाचे अर्ज विविध पातळ्यांवर सातत्याने करून ते त्रास देण्याचा व आमची संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे प्रतिपादन संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती एस.डी.जगताप यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्रीमती जगताप यांचे निवेदन योग्य असून संस्थेने श्री.पिंगळे यांना वेळोवेळी माहिती दिली आहे. तसेच आपल्या कार्यालयाकडूनही माहिती देण्यात आलेली आहे. परंतु श्री.पिंगळे तीच तीच माहिती संस्थेकडे, आपल्या कार्यालयाकडे व वरिष्ठ कार्यालयाकडेही मागत असतात, असे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, पुणे शहर(४), पुणे सहकारी संस्था, साखर संकुल आवार, शिवाजीनगर, पुणे यांनी पूर्वीच आयोगाला सादर केले असून त्याचाच पुनरूच्चार त्यांचे प्रतिनिधी श्री.आर.एम.जगताप यांनी केला.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्ता सातत्याने त्याच त्याच स्वरूपाची व विस्तृत माहिती विविध पातळ्यांवर मागत असल्याचे दिसते. माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ लागू नसतानाही संस्थेने वेळोवेळी माहिती दिल्याचे व देण्याची तयारी दर्शविल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट होते. या स्थितीत अपीलकर्ता माहितीच्या अधिकाराचा अयोग्य वापर करीत आहेत, असे दिसून येते. त्याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

कर्नल ऑलिव्हर हाईम
त्रिदलनगर को-ऑप.हौसिंग सोसायटी, स.नं.१९१-ए, येरवडा, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हानिबंधक(वर्ग-१),
मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर याचे कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२,
पुष्पमंगल इमारत, बिबवेवाडी कॉर्नर, दुगड चौक, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** कर्नल ऑलिव्हर हाईम
त्रिदलनगर को-ऑप.हौसिंग सोसायटी, स.नं.१९१-ए, येरवडा, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हानिबंधक(वर्ग-१),
मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर याचे कार्यालय, पुणे श्री.सी.बी.भुरकुंडे

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२,<br>पुष्पमंगल इमारत, बिबवेवाडी कॉर्नर, दुगड चौक, पुणे श्री.पी.डी.अहिरे | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.९.२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२४.४.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.२.२०१० रोजी घेण्यात आली.

त्रिदलनगरमधील एका सदनिकेच्या संदर्भात दि.३.७.१९९१ रोजी एका व्यक्तीच्या नावे नोंद झाली. त्यानंतर नऊ वर्षे त्यावर काहीही कार्यवाही झाली नाही व त्यानंतर दस्त नोंदणीचा आदेश देण्यात आला. याबाबत खरा दस्त कोणता याची विचारणा केल्यावर दस्ताची प्रमाणित प्रत नेण्यास आपलाला सांगण्यात आले. एकाच नोंदीबाबतच्या चार प्रती एकाच अधिकाऱ्याच्या सहीने केल्याचे दस्त असून संबंधित नोंदणी रद्द करावी, अशी मागणी अपीलकर्ता कर्नल ऑलिव्हर हाईम यांनी केली.

प्राप्तीकरविषयक कारणांमुळे नोंदणी प्रलंबित ठेवण्यात आली होती. दरम्यानच्या काळात दस्त गहाळ झाला होता. अन्य व्यक्तीच्या नावाची दस्ताची प्रत अपीलकर्त्यास चुकून दिली गेली होती. आता मूळ दस्त उपलब्ध झाला असून त्याची प्रत अपीलकर्त्यास देण्यात आली आहे. सदनिकेच्या चार दस्तांबाबतचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी दिले असून मूळ प्रत अपीलकर्त्यास देण्यात आली आहे. त्यामुळे कोणती प्रत प्रमाणित व खरी हा प्रश्नही राहिलेला

नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हानिबंधक(वर्ग-१), मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर याचे कार्यालय, पुणे श्री.सी.बी.भुरकुंडे यांनी केले. नोंदणी रद्द करण्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२३.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. श्रीपाद जनार्दनराव कुलकर्णी
नगरपरिषद शाळा क्र.११ समोर, दत्तमंदिराजवळ,
समता कॉलनी, उस्मानाबाद — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप नोंदणी महानिरीक्षक व
मुद्रांक उपनियंत्रक, पुणे, महाराष्ट्र राज्य,
नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११ ००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी
महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,
नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४९ / पुणे (अ) |
| २ | सुनावणीची तारीख | १७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. श्रीपाद जनार्दनराव कुलकर्णी
नगरपरिषद शाळा क्र.११ समोर, दत्तमंदिराजवळ,
समता कॉलनी, उस्मानाबाद

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप नोंदणी महानिरीक्षक व
मुद्रांक उपनियंत्रक, पुणे, महाराष्ट्र राज्य,
नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११ ००१
श्री. अं. रा. देवगुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी
महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,
नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११ ००१
श्री. चिंतामण भा. भुरकुंडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.१०.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दस्तऐवज नोंदणी करण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांच्या संदर्भात आपल्याला चुकीची माहिती दिली. मौजे वैराग ग्रामपंचायत क्षेत्रातील व नगर भूमापन काम पूर्ण झालेल्या क्षेत्रातील दस्तामध्ये सिटीएस क्रमांकाचा उल्लेख आवश्यक असतानाही तो नसलेल्या दस्ताची नोंदणी केल्याबाबत खोटी माहिती दुय्यम निबंधक, वैराग, ता. बार्शी यांनी दिली. याबाबत संबंधितांवर काय कारवाई केली व कोणते अधिकारी निर्णय घेणार आहेत आदीबाबतची माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. श्रीपाद जर्नादनराव कुलकर्णी यांनी केले. बनावट दस्ताची नोंद करून अधिकारी गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करणाऱ्यांना मदत करीत असल्याचे अनेक प्रकरणी उघडकीला येत असून त्या अनुषंगाने सार्वजनिक हिताचा प्रश्न असल्यामुळे तपशील जाहीर होणे आवश्यक आहे, असेही प्रतिपादन त्यानी केले. तसेच प्रतीला १०/- रू. असे अवाजवी शुल्क आकारल्याची तक्रार त्यांनी केली.

दुय्यम निबंधकांकडे श्री. कुलकर्णी यांनी केलेल्या अर्जात अ पत्रक गेले नसलेल्या दस्ताबाबत संबंधितांवर, तसेच नगर भूमापन झाले असताना सिटी सर्व्हे क्रमांक न नोंदविता दस्त नोंदविणाऱ्या उप निबंधकावर कारवाई केली. सर्व माहिती अपीलकर्ता यांना दिली. मात्र अपीलकर्त्याचा मूळ विषय हा त्यांच्यासह चार भावांच्या मालमत्तेतील एका भावाने त्यांच्या वाट्यातील हिस्सा वर्ग केला. तो व्यवहार करताना सिटी सर्व्हे क्रमांक न टाकता दस्त नोंदणी केली त्याविषयीचा वाद आहे. दस्त नोंदविताना मालकी हक्क तपासण्याचे अधिकार उपनिबंधकांना नाहीत, ही बाब अपीलकर्त्यास स्पष्ट करण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे श्री. चिंतामन भा. भुरकुंडे यांनी पूरक

कागदपत्रांसह केले. संगणक प्रतीला रू. १०/- हे शुल्क पूर्वीच निर्धारित करण्यात आले असल्यामुळे त्यानुसार आकारणी करण्यात आली, असेही त्यांनी नमूद केले.

अपीलकर्त्याला माहिती देण्यात आली आहे. त्यांनी उपस्थित केलेले अन्य मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचे नाहीत. दस्ताबाबत पूर्वनिर्धारित शुल्क घेण्यास नियमानुसार मान्यता असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांनी त्याबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वास गुलाबराव सणस
१३८, शुक्रवार पेठ, शिंदे आळी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, भूमी अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विश्वास गुलाबराव सणस
१३८, शुक्रवार पेठ, शिंदे आळी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय, पुणे श्री.चां.शं.शिंगाडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.२.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण मागितलेल्या कागदपत्रांच्या नकला व मूळ अर्जाचे उत्तर मिळाले नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.विश्वास गुलाबराव सणस यांनी केली.

गट योजनेतील दुरूस्तीबाबत श्री.सणस यांनी तक्रार केली होती. चौकशीसाठी तो अर्ज तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, भोर यांच्याकडे पाठविला होता. त्याबाबतचा अहवाल दि.२५.८.२००८ रोजी प्राप्त झाला. माहिती व उत्तर दिले आहे. मूळ प्रकरणातील कागदपत्रांच्या नकला अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांच्या कार्यालयातून ते प्राप्त करून घेऊ शकतात, असेही त्यांना कळविले. तथापि पूरक अर्जानुसार अतिरिक्त माहितीची मागणी व मूळ अर्जानुसार प्रशासकीय कार्यवाहीची मागणी त्यांनी केली आहे. दि.२८.२.२०१० पर्यंत मूळ प्रकरण मागवून त्यांना आवश्यक असलेल्या अतिरिक्त कागदपत्रांबाबतचे उत्तर देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे श्री.चां.शं.शिंगाडे यांनी केले.

मूळ अर्जाव्यतिरिक्त माहिती पूरक अर्जात करून ती न मिळाल्याची तक्रार करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. तसेच गट योजनेतील दुरूस्ती अथवा त्याबाबतची चौकशी ही मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) दि.२८.२.२०१० पर्यंत मूळ प्रकरण मागवून अपीलकर्त्यास उत्तर देण्याच्या निवेदनाबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांनी दि.५.४.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२३.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सर्जेराव अर्जुन धुमाळ
८/४१, बसवराज अपार्टमेंट,
सर्व्हे नं.९४/९५, भुसारी कॉलनी,
पौड रोड, कोथरुड, पुणे ४११ ०३८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक,**
संलग्न जमाबंदी आयुक्त,
भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यालय अधीक्षक,
भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय,
येरवडा, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६७/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.०२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.सर्जेराव अर्जुन धुमाळ
८/४१, बसवराज अपार्टमेंट,
सर्व्हे नं.९४/९५, भुसारी कॉलनी,
पौड रोड, कोथरुड, पुणे ४११ ०३८

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक,**
संलग्न जमाबंदी आयुक्त,
भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे-१ श्री.दि.दि.क्षीरसागर

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यालय अधीक्षक,
भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय,
येरवडा, पुणे-६ श्रीमती आशा जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०१.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०४.०१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०८.०२.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या गटाची मोजणी चुकीची झाली असल्यामुळे फेर मोजणी करुन जागेवर हद्दी दाखवाव्यात, या मागणीबाबत कार्यवाही झाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.सर्जेराव अर्जुन धुमाळ यांनी केली.

श्री.धुमाळ यांनी केलेली मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची असून त्या संदर्भातील माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या तक्रारअर्जानुसार फेरमोजणीबाबतच्या सूचना कनिष्ठ कार्यालयास देण्यात आल्या असून पोलीस संरक्षणात मोजणी करावी लागणार आहे. त्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली असून मार्च २०१० मध्ये हे काम ठेवण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय, येरवडा, पुणे-६ श्रीमती आशा जाधव यांनी नमूद केले. त्यामुळे अपील निकाली काढावे, असे लेखी निवेदन श्री.धुमाळ यांनी सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिप्तेश हसमुखलाल शहा
४०, नवा बाजार, खडकी, पुणे-३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महावितरण,
खडकी उपविभाग, खडकी, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महावितरण,
खडकी उपविभाग, खडकी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७१७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिप्तेश हसमुखलाल शहा
नवा बाजार, खडकी, पुणे-३

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महावितरण,
खडकी उपविभाग, खडकी, पुणे श्री.एम.ए.भोकरे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महावितरण,
खडकी उपविभाग, खडकी, पुणे श्री.ए.जी.पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.१२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.७.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२.२.२०१० रोजी घेण्यात आली.

सन २००१ मध्ये विद्युत मीटरच्या नावात बदल करताना कागदपत्रांवर खोट्या सह्या करण्यात आल्या आहेत, म्हणून या मूळ कागदपत्रांच्या प्रतींची मागणी आपण सन २००६ पासून करीत असूनही त्या दिल्या जात नाहीत, असे निवेदन अपीलकर्ता श्री.दिप्तेश हसमुखलाल शहा यांनी केले.

विद्युत मीटरच्या नावातील बदल सन १९९६ ते १९९८ च्या दरम्यान झालेला आहे. कार्यालयाचे अनेकदा स्थलांतर झाल्यामुळे कागदपत्रे सापडत नाहीत. अपीलकर्त्यास कागदपत्रांच्या अवलोकनासाठी सर्व नस्ती उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली आहे. अपीलकर्त्याची तक्रार ज्यांच्याविरूध्द आहे, त्या ग्राहकाकडेही कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली. परंतु अपीलकर्ता व संबंधित ग्राहक यांच्यात न्यायालयात दावा चालू असल्यामुळे कागदपत्रे देता येणार नाहीत, असे उत्तर ग्राहकाने दिले. वीज पुरवठा बंद करण्याची कारवाई करण्याचा इशारा दिला, परंतु न्यायालयात दावा चालू असल्यामुळे अशी कारवाई केली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महावितरण, खडकी उपविभाग, खडकी, पुणे श्री.ए.जी.पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण, खडकी उपविभाग, खडकी, पुणे श्री.एम.ए.भोकरे यांनी केले.

संबंधित ग्राहकाकडून कागदपत्रांची मागणी करावी व त्यानुसार प्रती अपीलकर्त्यास द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार मागणी केली असता,

ग्राहकाने न्यायालयीन प्रकरणामुळे कागदपत्रे देता येणार नसल्याचे, तसेच पार्टनरशिप डीड, कोटेशन रिसीट, शॉप अॅक्ट लायसेन्स वगैरे कागदपत्रे यापूर्वीच महावितरण कंपनीला सादर केली असल्याचे कळविले. कार्यालयातील नस्तीच्या अवलोकनासाठी अपीलकर्त्यास कळविले. परंतु ते आले नाहीत, असे सहाय्यक अभियंता, महावितरण, खडकी उपविभाग, खडकी, पुणे श्री.ए.जी.पाटील यांनी दि.११.२.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे. कागदपत्रे बनावट असल्याची अपीलकर्त्याची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र या संदर्भात मूळ कागदपत्रे उपलब्ध होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) विशेष पथक नियुक्त करून अपीलकर्त्याने मागणी केलेल्या कागदपत्रांचा शोध घेऊन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महावितरण, खडकी उपविभाग, खडकी, पुणे यांनी दि.१५.४.२०१० पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.३१.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.माधव बाबुराव क्षीरसागर
आयोध्या निवास, कुंभार आळी, घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, शिरूर नगरपालिका, ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.माधव बाबुराव क्षीरसागर
आयोध्या निवास, कुंभार आळी, घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे श्री.प्रकाश पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, शिरूर नगरपालिका,
ता.शिरूर, जि.पुणे श्री.पांडुरंग महाळेकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.६.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.१२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

नगरपालिकेने आपल्या जागेत केलेले अतिक्रमण काढून घेण्याबाबत केलेल्या अर्जावर तीस दिवसांत कार्यवाही केली नाही, व कार्यवाहीची माहिती दिली नाही, म्हणून आपण अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त(सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यानंतरही दिशाभूल करणारी माहिती मिळाली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.माधव बाबुराव क्षीरसागर यांनी केली.

आपल्या जागेच्या हद्दीबाहेरून गटारीचे काम करावे, अशी श्री.क्षीरसागर यांची मूळ मागणी होती. त्यासाठी मोजणी करून घेण्याबाबत त्यांना वेळोवेळी कळविले होते. तसेच ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसतानाही त्यांच्या मागणीनुसार गटारीचे काम पूर्ण करून दिले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, शिरूर नगरपालिका, ता.शिरूर, जि.पुणे श्री.पांडुरंग महाळेकर व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त(सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे श्री.प्रकाश पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्याची मुख्य मागणी माहितीची नसून प्रशासकीय कार्यवाहीची आहे व तीही पूर्ण करण्यात आली आहे, हे स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सदानंद जगन्नाथ शेरे
मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपआयुक्त,
सामान्य प्रशासन, विधान भवन,
पुणे विभाग, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याधिकारी,
जेजुरी नगरपरिषद, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३५/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता-** श्री.सदानंद जगन्नाथ शेरे<br>मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** उपआयुक्त,<br>सामान्य प्रशासन, विधान भवन,<br>पुणे विभाग, पुणे-१ श्री.प्रकाश पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याधिकारी,<br>जेजुरी नगरपरिषद, जि.पुणे श्रीमती सुषमा कोल्हे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.३.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शासनाच्या गट नकाशानुसार येणाऱ्या वाड्यावस्त्या जेजुरी नगरपरिषदेच्या हद्दीतील नसल्याचे सांगितले जाते. भारताच्या राष्ट्रपतींनी कळवूनही या वस्त्यांना नगरपरिषद पाणीपुरवठा करीत नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सदानंद जगन्नाथ शेरे यांनी केली.

आपल्या वस्तीचा भाग नगरपरिषदेच्या हद्दीत समाविष्ट करावा, अशी श्री.शेरे यांची मुख्य मागणी आहे. त्या अनुषंगाने ते मागत असलेली सर्व माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आली आहे. आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी दि.०९.०३.२००८ च्या पत्रान्वयेही याबाबतची वस्तुस्थिती त्यांना कळविलेली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त,सामान्य प्रशासन, विधान भवन,पुणे विभाग, पुणे-१ श्री.प्रकाश पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले. श्री.शेरे यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि.** 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय पोपटराव जगदाळे — **अपीलकर्ता**
राजवैभव प्रतिष्ठान,
औंध, ता.खटाव जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक महाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, सातारा क्षेत्र, जीवन तारा, एल.आय.सी. भवन, कोरेगांव रोड. सातारा — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्य व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, सातारा क्षेत्र, जीवन तारा, एल.आय.सी. भवन, कोरेगांव रोड, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१७४३/२००९/ सातारा** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८-०८-२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२-०९-२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०९-१०-२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२-१०-२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** बँक ऑफ महाराष्ट्र क्षेत्रीय कार्यालय साताराच्या कक्षेतील सर्व शाखांच्या ठेवी, तारण कर्जव्यवहार इ. बाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय पोपटराव जगदाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निर्णयाविरुध्द अपील केले आहे, ते सार्वजनिक प्राधिकरण हे केंद्रीय माहिती आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 29 MAR 2010